खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२२ – २३

### मराठी विभाग : मराठी भाषा संवर्धन पंधरवडा व्याख्यान

POSITIVE NEWS!

राजगुरुनगर

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे आयोजन



## उपयोजित मराठीमुळे व्यावसायिक संधी : डॉ. शेलार

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** मराठी विषयाच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमात उपयोजित व व्यावहारिक मराठीचा समावेश झाल्याने विद्यार्थ्यांना अनेक व्यावसायिक संधी उपलब्ध झाल्या असून विद्यार्थ्यांनी संबंधित भाषिक कौशल्य विकसित करावीत, असे आवाहन मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. सुधाकर शेलार यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त कार्यक्रमात बोलत होते.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, पाबळ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय घोडेकर, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. किशोर लांडेपाटील, प्रा. मच्छिंद्र मुळूक उपस्थित होते.

डॉ. शेलार पुढे म्हणाले, की विद्यार्थ्यांनी वक्तृत्व, संभाषण, प्रवचन, भारुड, कथाकथन, काव्यगायन, निवेदन, सूत्रसंचालन इत्यादी क्षेत्रातील भाषिक कौशल्य विकसित केली तर त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळून व्यावसायिक संधी उपलब्ध होऊ शकतात. विद्यार्थ्यांमध्ये जिद्द, चिकाटी असेल तर ते कोणत्याही विषयात करियर करू शकतात. यासाठी विद्यार्थ्यांनी विस्तृत व्यासंग करावा, असे आवाहन त्यांनी केले. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी विद्यार्थ्यांना वाचन कौशल्य विकसित करून व्यक्तिमत्त्व विकास साधावा, असे सांगितले. मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त 'वाचू आनंदे' या उपक्रमाचे आयोजन केले. विद्यार्थ्यांनी अधिकाधिक अवांतर वाचन करावे, यासाठी प्रयत्न करत असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी तर आभार प्रा. प्रतीक्षा खराडे यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख